# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-25.07.2026** **वार- शनिवार**

---

**आषाढी एकादशी**

आषाढी एकादशीसाठी पंढरपूरमध्ये लाखो भाविक दाखल झाले असून विठूरायाच्या गजरानं पंढरी दुमदुमली आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पहाटे सपत्नीक केली.

**निवडुंग्या विठ्ठल-रुक्मिणी**

पुणे शहरातील निवडुंग्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात शिवसेना नेत्या आणि आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची विधिवत महापूजा, काकड आरती आणि महाप्रसादाचं वाटप करण्यात आलं. पुण्यातील विठ्ठलवाडी इथल्या विठ्ठल मंदिरातही आषाढी एकादशीला आपल्या लाडक्या विठूरायाचं दर्शन घेण्यासाठी भक्तांची गर्दी झाली होती.

**'एअर ॲम्ब्युलन्स**

आषाढी वारीच्या इतिहासात यंदा आरोग्य सेवेसाठी पहिल्यांदाच उपलब्ध करण्यात आलेल्या 'एअर ॲम्ब्युलन्स' म्हणजे हवाई रुग्णवाहिका सेवेचा लाभ वारीदरम्यान प्रकृती गंभीर झालेल्या एका वारकऱ्याला झाला. या हवाई रुग्णवाहिके द्वारे पुढील उपचारांसाठी त्याला सोलापूर इथल्या रुग्णालयात हलवण्यात आलं. वेळेवर मिळालेल्या वैद्यकीय उपचारांमुळे रुग्णाचा जीव वाचवण्यास मदत झाली.

**धर्मेंद्र प्रधान राजीनामा**

नीट पेपरफुटी प्रकरणी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला. गेल्या दहा दिवसांत विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे आपल्याला दुःख झालं असून, हा आपल्यासाठी प्रतिष्ठेचा प्रश्न नाही, असं प्रधान यांनी समाज माध्यमावरील त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचं मार्गदर्शन, विश्वास आणि पाठिंब्याबद्दल प्रधान यांनी त्यांचे आभारही मानले आहेत. राष्ट्रसेवा हेच आपल्या आयुष्यातील सर्वोच्च प्राधान्य असून आपण त्यासाठी सदैव समर्पित राहू, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

**महसूल अभियान**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल आणि वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे तसंच आंबेगाव तालुक्यातील विविध शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत, समाधान शिबिराचं आयोजन आंबेगाव तालुक्यातल्या मंचर इथं, उद्या सकाळी ११ वाजता शिवगिरी मंगल कार्यालय इथं करण्यात आलं आहे. या शिबिराचं उद्घाटन आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ एकाच ठिकाणी आणि एकाच दिवशी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि इतर अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे.

**बोधचिन्ह**

पुण्यात जानेवारी २०२७ मध्ये होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी अधिकृत बोधचिन्ह निवडण्यासाठी राष्ट्रीय खुल्या स्पर्धेचं आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती आयोजक समितीनं पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट बोधचिन्हास ५१ हजार  रुपये रोख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. प्रवेशिका पाठवण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२६ आहे.

**आरोग्यवारी**

आरोग्यवारी अल्ट्राग्रुप रन-२०२६ मॅरेथॉन स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर उद्या सकाळी विविध मार्गांवर वाहतूक सुरळीत राहावी, स्पर्धकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य मिळावे आणि वाहतूक कोंडी टाळता यावी, यासाठी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी वाहतुकीत तात्पुरते बदल करण्याचे आदेश जारी केले आहेत.

यानुसार उद्या सकाळी ४ ते दुपारी १२ या कालावधीत पुण्याकडून जेजुरीमार्गे सातारा, फलटण आणि बारामतीकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. ही वाहतूक सासवड–नारायणपूर–कापूरहोळ, सासवड–वीर फाटा–परिंचे–लोणंद तसंच सासवड–पानवडी–मेमाणे–पिसर्वे–सुपा या पर्यायी मार्गांवरून वळविण्यात येणार आहे.
पुणे, बारामती, केडगाव चौफुला, सातारा आणि लोणंदकडे जाणाऱ्या वाहनांसाठीही पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

**पाऊस**

पुणे जिल्ह्यात यंदाच्या मान्सून हंगामात आतापर्यंत सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. महसूल विभागाच्या आकडेवारीनुसार, जूनपासून आजपर्यंत जिल्ह्यात ४६२ दशांश ५ मिलिमीटरच्या सरासरीच्या तुलनेत ५६५ दशांश ३ मिलिमीटर पाऊस झाला असून, तो सरासरीच्या सुमारे १२२ टक्के आहे.

जिल्ह्यातील मावळ तालुक्यात सर्वाधिक १ हजार ४३१ मिलिमीटर, म्हणजेच सरासरीच्या २५१ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ मुळशीत १ हजार ४ दशांश ८ मिलिमीटर, वेळेमध्ये ९७१ मिलिमीटर आणि भोरमध्ये ५८० दशांश २ मिलिमीटर पाऊस झाला आहे.

दुसरीकडे, इंदापूरमध्ये केवळ ५८ दशांश १ मिलिमीटर, बारामतीमध्ये ८७ दशांश ६ मिलिमीटर आणि दौंडमध्ये १३३ दशांश २ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, हे तालुके अद्याप सरासरीपेक्षा कमी पावसाच्या क्षेत्रात आहेत.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज दिवसभर पावसाचा लपंडाव सुरू होता. आज कमाल तापमान २९ तर किमान तापमान २२ पूर्णांक ४ अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं. उद्या काही हलक्या सरी तर काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**